महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी......

## महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१४/प्र.क्र.२०७/एसएम-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दिनांक: २५ जून,२०१४

**वाचा**

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभांग क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३) /माशि-१, दिनांक १५ जून, २०१३.

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. स्वयंअ-२०१३/ (८५/१३)(II) /माशि-१, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३

**प्रस्तावना**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये ३२४७ संस्थांच्या शाळा पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. तथापि, सदर शासन निर्णयामध्ये पात्र झालेल्या प्रस्तावांपैकी काही प्रस्तावांच्या शाळांच्याबाबतीत त्यांनी मूळ प्रस्तावामध्ये मागणी केल्यानुसार अभ्यासक्रम, शाळांचे माध्यम, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक वा प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळा मंजूर झाल्या नव्हत्या. तसेच अपात्र झालेल्या प्रस्तावांच्या बाबतीत संबंधित संस्थांनी आपल्या निवेदनाव्दारे या बाबी शासनाच्या निदर्शनास आणल्या आहेत. संबंधित संस्थांची निवेदने तसेच, क्षेत्रीय कार्यालयाचे अभिप्राय/अहवालाच्या अनुषंगाने दुरुस्त्या व परवानगीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये अर्ज केलेल्या संस्थांनी त्रुटींची पूर्तता केल्यामुळे सोबतच्या "विवरणपत्र-अ" नुसार त्यांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यास परवानगी देण्यात येत आहे, संदर्भाधीन

शासन निर्णय दिनांक १५ जून, २०१३ व ५ ऑक्टोबरं, २०१३ अन्वये यापूर्वी उपरोक्त अधिनियमाखाली परवानगी देण्यात आली होती त्या शासन निर्णयामधील अटी शर्ती या संस्थांनासुध्दा लागू राहतील. संदर्भाधिन शासन निर्णयान्वये मंजूरी दिलेल्या शाळांपैकी "विवरणपत्र'ब" मध्ये दर्शविलेल्या शाळांबाबतीत त्यांच्यासमोर दर्शविलेल्या दुरुस्ती/सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या अधिनियमाखाली शासन परवानगी दिलेल्या संस्थांच्या बाबतीत खालील बाबींची शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांच्या स्तरावर खातरजमा करण्यात यावी :-

१) शाळेने प्रस्तावित केलेली जागा/जमीन नियमानुसार किमान २ एकर सलग/अथवा शाळेसाठी योग्य असल्याची संबंधित शिक्षणाधिकारी यांनी खात्री करावी. सदर जागा/जमीन नियमानुसार आढळून न आल्यास संस्थेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

२) दाननिधी (कायम मुदतठेव) पावती संस्थेच्या नावावर शाळा मान्यतेचा प्रस्ताव दाखल केल्याच्या दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरिता असणे आवश्यक आहे. मुदतीनंतर त्याचे नूतनीकरण करण्याबाबत संबंधित संस्थेची /शाळा व्यवस्थापनाची व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांची जबाबदारी राहील. अशी कायम मुदतठेवीची मूळ पावती संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचेकडे तारण म्हणून ठेवावी .

२. सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्था यांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१४०६२६१७३०३८६९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2014.06.27 13:57:34 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त

३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. विभागांतर्गत सर्व संचालक.
९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१०. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
११. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.
१२. संबंधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपालिका

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
२. मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
३. मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
४. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. निवडनस्ती (एसएम -२).

(4)

विवरणपत्र -अ

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१४ /प्र.क्र.२०७/एसएम-२, दि. २५ जून, २०१४ चे सहपत्र महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत परवानगी देण्यात येत असलेल्या शाळांची यादी.

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| 1 | अहमदनगर | चैतन्य ग्राम विकास मंडळ, ता. अकोले जि. अहमदनगर | माध्यमिक विद्यालय, शेलद, ता. अकोले जि. अहमदनगर | उच्च प्राथमिक | नवीन शाळा | मराठी | पात्र |
| 2 | कोल्हापूर | एम.जी.पाटील चॅरिटेबल ट्रस्ट, कसबा तारळे ता. राधानगरी जि. कोल्हापूर | सारजाई इंग्लिश मेडियम स्कुल, कसबा तारळे ता. राधानगरी जि. कोल्हापूर | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 3 | गडचिरोली | बल्लारपूर सेवा समिती, बल्लापूर, गडचिरोली | मोसीनभाई जव्हेरी कनिष्ठ महाविद्यालय देसाईगंज, जिल्हा गडचिरोली | उच्च माध्यमिक | नवीन शाळा | मराठी | पात्र |
| 4 | गोंदिया | मागासवर्गीय महिला बहुउद्देशिय शिक्षण संस्था, गोंदिया | यु ए जी कनिष्ठ महाविद्यालय, गांगला ता. तिरोडा जि. गोंदिया | उच्च माध्यमिक | नवीन शाळा | मराठी | पात्र |
| 5 | गोंदिया | श्री गणेशन मल्टीपरपज एज्युकेशन सोसायटी गोंदीया | श्री गणेशन हायस्कुल, गोंदिया | उच्च माध्यमिक (विज्ञान) | दर्जावाढ | इंग्रजी | पात्र |
| 6 | जळगाव | सरदार वल्लभाई पटेल सेवाभावी शैक्षणिक संस्था धुळे | श्री साई इंग्लिश मिडीयम स्कुल, गलंगी ता. चोपडा जि. जळगाव | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 7 | जळगाव | आत्मविश्वास जनसेवा संस्था पातोंड ता. चाळीस्गाव जि. जळगाव | क्रांतीसुर्य प्राथमिक विद्यामंदिर पातोंड ता. चाळीस्गाव जि. जळगाव | प्राथमिक | नवीन शाळा | मराठी | पात्र |
| 8 | ठाणे | समीर ज्ञानप्रसारक विश्वस्त निधी, मुंब्रा, जि.ठाणे | ज्ञानदीप कॉन्व्हेंट स्कूल, मुंब्रा, जि.ठाणे | माध्यमिक | दर्जावाढ | इंग्रजी | पात्र |
| 9 | ठाणे | मलानकारा आर्थोडॉक्स चर्च ऑफ बॉम्बे | सेंट मेरीज तेजस्विनी स्कुल, वाशी, जि.ठाणे | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |

(5)

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१४ /प्र.क्र.२०७/एसएम-२, दि. २५ जून, २०१४ चे सहपत्र महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत परवानगी देण्यात येत असलेल्या शाळांची यादी.

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| 10 | ठाणे | नारायणन नायर एज्युकेशनल ट्रस्ट, ठाणे | शारदा इंग्रजी स्कुल चिंचपाडा, अंबरनाथ जि. ठाणे | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 11 | ठाणे | स्व. नगरसेविका मिनाताई विजय चौगुले रहिवासी सेवा मंडळ, ऐरोली, नवी मुंबई, जि. ठाणे | चंद्राबाई लक्ष्मण चौगुले विद्यालय, गणेशनगर, चिंचपाडा, ऐरोली, जि. ठाणे | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 12 | ठाणे | ठाकूर श्री गजानन्द सिंग एज्युकेशम ट्रस्ट, नालासोपारा वसई जि. ठाणे | गजानंन्द सिंग प्राथमिक माध्यमिक हायस्कुल, हिंदी माध्यम, नालासोपारा ता. वसई जि. ठाणे | प्राथमिक ते माध्यमिक | नवीन शाळा | हिंदी | पात्र |
| 13 | ठाणे | अर्चना एज्युकेशन ट्रस्ट, मलबार हिल, मुंबई | रतनबाई दमाणी प्राथमिक इंग्लिश मिडीयम स्कूल, चैत्रबन कंपाउंड , सावरोली रोड,शहापूर, जि.ठाणे | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 14 | नांदेड | मुक्ताई प्रतिष्ठान, देगलूर, ता. देगलूर जि. नांदेड | संत तुकाराम इंग्लिश स्कूल, देगलूर, ता. देगलूर जि. नांदेड | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 15 | नांदेड | श्री. सिद्धीविनायक शिक्षण प्रसारक मंडळ, बहादर पुरा, ता. कंधार, जि. नांदेड | श्री. गणेश उच्च माध्यमिक विद्यालय, नंदीग्राम सोसायटी, नांदेड | उच्च माध्यमिक | दर्जावाढ | मराठी | पात्र |
| 16 | अहमदनगर | श्री नवनाथ रुरल एज्युकेशन ॲान्ड डेव्हलपमेंट सोसायटी, पदमपूरा स्टेशनरोड, औरंगाबाद | इनोव्हेटर्स इंग्लिश मिडीअम स्कुल, चंदनापुरी ता. संगमनेर जि. अहमदनगर | उच्च माध्यमिक | दर्जावाढ | इंग्रजी | पात्र |
| 17 | नाशिक | सुवर्णा चारिटेबल ट्रस्ट, नाशिक | कॅडेन्स विद्यामंदीर, भारतनगर, आडगांव, पंचवटी | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 18 | पुणे | साई प्रसाद शिक्षण संस्था, जळोची ता. बारामती जि.पुणे | डॅफोडिल्स इंग्लिश मेडियम स्कुल, जंक्शन ता. इंदापूर जि.पुणे | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 19 | पुणे | देवमाथा चॅरिटीबल ट्रस्ट, परिंचे ता. पुरंदर जि.पुणे | सेंट मेरिज पब्लिक स्कुल स्कुल, परिंचे ता. पुरंदर जि.पुणे | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१४ /प्र.क्र.२०७/एसएम-२, दि. २५ जून, २०१४ चे सहपत्र महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत परवानगी देण्यात येत असलेल्या शाळांची यादी.

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ६ | ७ | ८ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | | | |
| 20 | पुणे | भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम आझाद प्रतिष्ठान बारामती जि.पुणे | भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम इंग्लिश मेडियम स्कुल, भिगवण रोड ता. बारामती जि.पुणे | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 21 | पुणे | मावळ शिक्षण प्रतिष्ठान तळेगाव दाभाडे ता. मावळ जि.पुणे | प्रतिक विद्यानिकेत निगडे ता. मावळ जि.पुणे | उच्च माध्यमिक | दर्जावाढ | मराठी | पात्र |
| 22 | पुणे | प्रगती शिक्षण संस्था, पुणे | प्रगती विद्या मंदिर, पुणे | माध्यमिक | दर्जावाढ | मराठी | पात्र ४० हजार राष्ट्रीयकृत बॅंकेत ठेवण्याच्या अटीवर पात्र |
| 23 | पुणे | युगंधर शिक्षण संस्था ता. शिरुर जि.पुणे. | सी.एस.भुजबळ ग्लोबल स्कुल, मलठण ता.शिरुर जि.पुणे | प्राथमिक (सी.बी.एस.ई) | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 24 | बुलढाणा | महात्मा फुले शिक्षण संस्था, निमगाव ता.जि. बुलढाणा | महात्मा फुले हायस्कुल, निमगाव ता. जि. बुलढाणा | उच्च माध्यमिक | दर्जावाढ | मराठी | पात्र |
| 25 | वर्धा | कस्तुरबा वुमेन्स मल्टीपरपज, सोसायटी बोरगाव (मेघे) वर्धा | कस्तुरबा ज्युनिअर कॉलेज, रोठा ता.जि. वर्धा | उच्च माध्यमिक | दर्जावाढ | मराठी | पात्र |
| 26 | वाशिम | जनता बहुउददेशीय संस्था, मानोरा, जि. वाशिम | अलमेहमुद इंटरनॅशनल स्कूल, मु.पो. कानडी, अकोटरोड, अकोला | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 27 | सांगली | राधाकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ, कोरेगाव ता. वाळवा जि. सांगली | भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम इंग्लिश मिडीयम स्कूल, कोरेगाव, ता. वाळवा, जि.सांगली | प्राथमिक ते माध्यमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 28 | ठाणे | आगरी विद्यार्थी मंडळ, २ भोईवाडा, नारपोली, आग्रारोड, भिवंडी, जि.ठाणे | २ भोईवाडा, नारपोली, आग्रारोड, भिवंडी, जि.ठाणे | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१४ /प्र.क्र.२०७/एसएम-२, दि. २५ जून, २०१४ चे सहपत्र महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत परवानगी देण्यात येत असलेल्या शाळांची यादी.

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| 29 | हिंगोली | अमृतज्ञान सेवाभावी संस्था, वसमत, जि. हिंगोली | लाल बहादुर शास्त्री प्राथमिक इंग्लिश स्कूल, वसमत, ता. वसमत जि.हिंगोली | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 30 | अहमदनगर | निर्मोही ग्राम शिक्षण संस्था, चास ता.जि.अहमदनगर | रंगुबाई काळे इंग्लिश मेडियम स्कूल, चास, ता.जि.अहमदनगर | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |

O/C

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID:- sm2.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.४५४/एसएम-२
दिनांक :- ०९ मे, २०२३

## मान्यता पत्र

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
भारतरत्न डॉ. अबुल कलाम आझाद प्रतिष्ठाण,
सिध्देश्वर कार्नर, ढोर गल्ली, बारामती, जि. पुणे.

विषय - महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र ...

**भारतरत्न डॉ. अबुल कलाम आझाद प्रतिष्ठाण, बारामती, जि. पुणे संचलित बी.ए.के.ए.पी. इंग्लिश मिडिअम स्कुल, गट क्र. १३४/४, मौजे जळोची, ता. बारामती, जि. पुणे.**

संदर्भ - इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र. ४५४/एसएम-२, दिनांक २५.०८.२०२१

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **भारतरत्न डॉ. अबुल कलाम आझाद प्रतिष्ठाण, बारामती, जि. पुणे** या संस्थेने सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून **बी.ए.के.ए.पी. इंग्लिश मिडिअम स्कुल, गट क्र. १३४/४, मौजे जळोची, ता. बारामती, जि. पुणे या प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ. ६ वी ते इ. १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ)** शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ मान्यतेकरीता अर्ज सादर केला होता.

२. वर नमुद केलेल्या विषयावरील आपल्या अर्जाच्या संदर्भात, आपणांस असे कळविण्यात येत आहे की, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून **भारतरत्न डॉ. अबुल कलाम आझाद प्रतिष्ठाण, बारामती, जि. पुणे संचलित बी.ए.के.ए.पी. इंग्लिश मिडिअम स्कुल, गट क्र. १३४/४, मौजे जळोची, ता. बारामती, जि. पुणे या प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इ. ६ वी ते इ. १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ)** शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरीता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासुन सदर दर्जावाढ करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे.

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तीची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तीचे आणि या

अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. /सी.आय.एस.सी.ई. /सी.ए.आय.ई. /आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून **"स्वयंअर्थसहाय्यित शाळा"** अशी माहिती भरतील व **यु.डी.आय.एस.इ.** क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर **"स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा"** असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

प्र.स्व. पडोळे

(प्रदिप पडोळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
७. निवड नस्ती (४५४/२१/एसएम २).